भाप्रसे (संवर्ग) नियम, १९५४ मधील ४ (२) मधील परंतुकानुसार Apex Scale [Level 17 in the Pay Matrix] या संवर्गात तात्पुरत्या स्वरुपात पद निर्मिती करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः एईओ-१०१७/प्र.क्र.६८२ /२०१७/दहा,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२,
तारीख: **०३.०५.२०१८**

प्रस्तावना-

कार्मिक, सार्वजनिक गा-हाणी व निवृत्ती वेतन मंत्रालय (कार्मिक व प्रशिक्षण विभाग), भारत सरकार यांच्या दिनांक १६.०२.२०१५ च्या सुधारित भारतीय प्रशासन सेवा (संवर्गबळ निश्चित करणे), सुधारणा, २०१५, अधिसूचने अन्वये, राज्यातील भारतीय प्रशासन सेवेतील संवर्ग पदांचे संख्याबळ निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार Apex Scale: Level 17 in the Pay Matrix या संवर्गात ७ संवर्ग पदे मंजूर आहेत. तसेच भाप्रसे (वेतन) नियम २०१६ मधील नियम १२ (७) मधील तरतूदीनुसार आणखी ७ संवर्गबाहय पदे (SDR) भरता येतात. भारतीय प्रशासन सेवा (संवर्ग) नियम, १९५४ मधील नियम ४ (२) च्या दुसऱ्या परंतुकाअन्वये सदर संवर्गात तात्पुरत्या स्वरुपात पद निर्मितीचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय-

भारतीय प्रशासन सेवा (संवर्ग) नियम, १९५४ मधील नियम ४(२) च्या दुस-या परंतुकाअन्वये Apex Scale: Level 17 in the Pay Matrix या संवर्गात दिनांक ०१.०३.२०१८ पासून दिनांक ३०.०४.२०१८ पर्यंत १ पद आणि दिनांक ०१.०५.२०१८ पासून दिनांक ३१.०७.२०१८ पर्यंत १ पद निर्माण करण्यास केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या महाराष्ट्रातील भाप्रसे संवर्ग संख्याबळ आढाव्याच्या प्रस्तावाच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५०३११४०२१६१०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sarita Rishi Bandekar Deshmukh

Digitally signed by Sarita Rishi Bandekar Deshmukh
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5140223e17381bc47a67b9fede8dda33c03e3e9ce591f826d8193080c68a08b8, serialNumber=e40a063b6b4e8f59f91f350aa6fec292a55db5bf8829c64d6c44e00a701cdaac, cn=Sarita Rishi Bandekar Deshmukh
Date: 2018.05.03 16:08:20 +05'30'

(स.रि.बांदेकर-देशमुख)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
४. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग,
५. महालेखापाल, मुंबई/नागपूर,
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
७. निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
८. निवड नस्ती.